दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे मो.नं. ९४२२६६००७७
बीड/महाराष्ट्र | बुधवार १५ मे २०२४ | आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ | वर्ष १ ले | अंक २७० | पाने ४ | किंमत ४ रुपये

# धक्कादायक, राज्यातील शाळांमध्ये ५ लाख विद्यार्थी बोगस, संस्थाचालकांनी कशा पद्धतीने चालवली कोट्यवधींची लूट



राज्यातील शिक्षण क्षेत्रात धक्कादायक बाब उजेडत आली आहे. खासगी संस्थाचालकांनी बोगस विद्यार्थी दाखवून शासनाची लूट चालवली आहे. राज्यात तब्बल पाच लाख विद्यार्थी बोगस आढळले आहेत. शाळांची पटसंख्या पूर्ण करण्यासाठी वर्ग कमी होऊ नये यासाठी बोगस विद्यार्थी दाखवून अनुदान लाटले जात आहेत. राज्यात दरमहा बोगस विद्यार्थ्यांवर पाचशे कोटी रुपये खर्च केले जात असल्याचे सांगितले जात आहे. ही बोगस विद्यार्थी संख्या आधार कार्डमुळे समोर आली आहे. राज्यात एकूण 5 लाख 16 हजार 188 विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेश आधार कार्ड नसताना झाला आहे. हे विद्यार्थी बनावट असल्याचे स्पष्ट झाले आहे. शासनाने विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेश करताना आधार कार्ड (Aadhaar Card) लिंक करणे बंधनकारक केले आहे.काय सुरु आहे प्रकारराज्यातील खासगी आणि सरकारी शाळांमध्ये 5 लाख विद्यार्थी बोगस आढळून आली आहेत. आधार कार्ड नसलेले 5 लाखांवर विद्यार्थी दाखवून शाळांनी पदे मंजूर करुन घेतली. युडायस प्रणालीत दाखवलेली पटसंख्या त्या तुलेनेत नोंदविलेली आधार संख्या यावरून राज्य शिक्षण विभागाने आक्षेप नोंदवला आहे. राज्यातील सरकारी शाळांमध्ये 55 लाख 26 हजार 874 विद्यार्थी आहेत. परंतु त्यापैकी आधार नसलेले 1 लाख 79 हजार 56 विद्यार्थी आहेत. म्हणजेच हे विद्यार्थी बोगस आहेत. खासगी अनुदानित शाळांमध्ये एकूण 97 लाख 69 हजार 202 विद्यार्थी आहेत. त्यापैकी आधार क्रमांक नसलेले 1 लाख 11 हजार 444 विद्यार्थी आहेत. तसेच खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये 62 लाख 61 हजार 778 विद्यार्थी आहेत. त्यातील 2 लाख 25 हजार विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नाही. म्हणजे एकूण 5 लाख 16 हजार 188 विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नाही.आधार नसताना वाढीव पट दाखविलाराज्यातील अनेक शाळांनी विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नसताना वाढीव पट दाखवला आहे. राज्यातील खासगी शाळांवर शिक्षण खात्याचा थेट आक्षेप आहे. यामुळे राज्य शासनाचे कोट्यवधी रुपये दर महिन्याला जात आहेत. राज्यात सर्वात आधी २०२१ मध्ये बीड जिल्ह्यात बोगस पटसंख्या दाखवून शासनाची फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला होता. त्यावर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये ‘जनहित याचिका’ दाखल झाली होती. त्यानंतर न्यायालयाने चौकशीसाठी न्यायमूर्ती पी. व्ही. हरदास (निवृत्त) यांची समिती नेमली होती. या समितीने जुलै २०२२ मध्ये अहवाल शासनाला दिला. तो अहवाल शासनाने स्वीकारला आणि मार्गदर्शक सूचना आता काढल्या होत्या. त्यामुळे शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश घेताना आधारची सक्ती करण्यात आली आहे.

### आरटीईची प्रवेश प्रक्रिया कधी सुरु होणार ?

मे महिन्याचा दुसरा आठवडा झाला त्यानंतर राज्यात आरटीई प्रवेश सुरु झाले नाही. यामुळे आरटीईची प्रवेश प्रक्रिया कधी सुरू होणार ? असा प्रश्न पालकांनी राज्य शासनाला विचारला आहे. आरटीई प्रवेश प्रक्रियेच्या नियमात बदल केल्याने पालकांनी घेतली होती. त्यानंतर उच्च न्यायालयाने नवीन बदलास स्थगिती दिली होती. ९ फेब्रुवारीच्या अधिसूचनेला स्थगिती दिल्यानंतर नवीन पत्र राज्य शासनाने काढणे आवश्यक होते. मात्र अजुनही हालचाल होत नसल्याने पालक नाराज आहे. आरटीई अंतर्गत खाजगी शाळात २५ टक्के जागा राखीव ठेवाव्या लागतात.

## दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांचे इयत्ता दहवी CBSE बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश

**वादळवार्ता/परळी**

दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल परळी वैजनाथ येथील विद्यार्थ्यांनी परत आपल्या कर्तृत्वाची चुणूक दाखवत सर्व पंचक्रोशित अतुलनिय तसेच प्रशंसनीय असा किर्तीमान २०२३-२०२४ सी बी एस सी बोर्ड परीक्षेत १०० % निकाल देऊन स्थापित करत, संपूर्ण परिसराला थक्क केले आहे.या वर्षी एकूण ४३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि त्यापैकी ४ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. यामध्ये अजिंक्य देशमुख शाळेत प्रथम येत त्याने ९७.४०% गुण मिळवले आहेत, तर आर्या नावंदरने ९४.८% गुण घेत दुसरा क्रमांक मिळवला आहे, याचबरोबर सोमनाथ मुंडे याने ९०.४% गुण तर तपन शिंदे याने ९०% गुण संपादन करत तिसरा तसेच चौथा क्रमांक मिळवला आहे. हा उल्लेखनीय आणि प्रशंसनीय निकाल म्हणजे शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षवृंद , शिक्षकेतर कर्मचारी आणि साहजिकच विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हे शक्य झाले आहे.या यशाबद्दल शाळा व्यवस्थापकीय अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते तसेच आमचे मार्गदर्शक श्री.किरण गित्ते साहेब सचिव त्रिपुरा सरकार यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले, तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## नेकनूर मध्ये शांततेत + 66% मतदान

**नेकनूर/शेख शाकेर**

काल लोकसभेसाठी झालेल्या मतदानामध्ये नेकनूर मध्ये ६६% मतदान अगदी शांततेत पार पडले. गेल्या पंचवार्षिकच्या लोकसभेच्या मतदानापेक्षा यावर्षी मतदानाचा टक्का वाढलेला पहावयास मिळाला. यामध्ये मतदारांनी कोणाच्याही गाडीची किंवा वाहनांची वाट न पाहता स्वत:स्वखर्चाने येऊन मतदानाचा हक्क बजावल्याचे पहावयास मिळाले. काल पार पडलेल्या लोकसभेच्या मतदानामध्ये नेकनूर मध्ये नेकनूर व वैतागवाडी मध्ये एकूण ११ बूथ होते यामध्ये एकूण १२५५८ मतदानापैकी आठ हजार तीनशे नऊ मतदान झाले या मतदानाची टक्केवारी ६६ टक्के असून



गेल्या पंचवार्षिक परीक्षा यावर्षी टक्का

वाढल्याचे पहावयास मिळाले. अगदी शांततेत, कोणतेही गालबोट न लागता हे मतदान पार पडल्याने सर्वांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. परंतु काही ठिकाणी मशीन स्लो चालत असल्यामुळे मतदारांच्या मोठ्या प्रमाणात रांगा पहावयास मिळाल्या तर एका बूथ वरील मशीन खूपच स्लो चालत असल्यामुळे मतदान प्रक्रिया जवळपास सात वाजेपर्यंत चालली.

## मानवता रत्न पुरस्कार मिळालेबद्दल भगवान गुरव यांचा क!! वाळवे ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

**वादळवार्ता/कुडूत्री**

गेली १३ वर्षे सामाजिक कार्याला वाहून घेणारे व अनंतशांती संस्थेला राज्यभर नावलौकिक मिळवून देणारे अनंतशांतीचे संस्थापक भगवान गुरव यांना प्रेरणा फाउंडेशन कल्याण (मुंबई) मानवतारत्न पुरस्कार (२०२४) मिळाला याबद्दल कसबा वाळवे येथील ग्रामस्थ व मान्यवर यांचेकडून पुष्पगुच्छ, फेटा देऊन सत्कार करण्यात आला.हा सत्कार एकनाथ पाटील, (ई. जी) यांच्या हस्ते संपन्न झाला.

सत्काराला उत्तर देताना भगवान गुरव म्हणाले “मिळालेला पुरस्कार हा माझा नसून समस्त क!!वाळवे



ग्रामस्थांचा आहे.आज पर्यंत विविध उपक्रम राबविले असून त्यामध्ये पन्नास हजार लोकांना मोफत चस्मे वाटप,गरजूंना साडी,फराळ वाटप,विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तीना पुरस्कार,कोरोना काळात आर्सेनिक गोळ्या वाटप,अनेक शाळेत संगणक वितरण आदी कार्यासाठी हा पुरस्कार मिळाला असल्याचे त्यांनी या वेळी अधोरेखित केले.

सत्कार समारंभास श्रीकांत भांदीगरे,संतोष पाटील,नेताजी पाटील,बाबुराव गुरव, अरविंद कांदळकर,बाबुराव पाटील, जीवन गुरव, अमित कांदळकर, श्रीरंग सोरप, बाबुराव भांदीगरे, सुनिल संकपाळ,आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत संतोष पाटील सर यांनी तर आभार अमित कांदळकर सर यांनी मानले.

## जीवाचीवाडी शिवारात अवकाळी पावसाने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान

**वादळवार्ता/केज**

एकतर दुष्काळामध्ये आपल्या शेततून पिक घेण्यासाठी शेतकरी प्रयत्न करत असताना अवकाळी पाऊस वा इतर अनेक संकटांचा सामाना शेतकऱ्याला करावा लागत आहे कुठलेच पिक शेतकऱ्याच्या पदरी पडत नाही




केज तालुक्यातील जीवाची वाडी येथे अवकाळी पावसाने शेतकरी लक्ष्मण गोपाळ चौरे यांच्या शेतातील पिकाचे अतोनात नुकसान झाले असुन शासनाने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी असे लक्ष्मण गोपाळ चौरे यांची मागणी आहे.

## आगरी कोंढरीपाडा ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्कार.

**उरण/विठ्ठल ममताबादे**

दिनांक ६ में २०२३ रोजी उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत दद्दीतील आगरी कोंढरीपाडा येथे श्री हनुमान मंदिरात श्री हनुमान मूर्तीची विटंबना झाली ही विटंबना गावात राहणाऱ्या भालचंद्र नारायण पाटील या समाजकंटकाने केली होती. सदर इसमावर उरण पोलीस ठाण्यात त्याने केलेल्या गुन्हयाबाबत रीतसर एफ.आय. आर देखील नोंदविण्यात आले. मात्र राजकीय हस्तक्षेपामुळे सदर इसमावर कोणतेही कायदेशीर कारवाई झाली नाही. सदर इसमावर कठोरात कठोर कारवाई व्हायला पाहिजे होती. मात्र प्रत्यक्षात तसे झाली नाही. त्यामूळे संतप्त ग्रामस्थांनी मतदानाच्या दिवशीच म्हणजेच १३ मे २०२४ रोजी मतदानावरच जाहीर बहिष्कार घातला आहे.याबाबत सदर सर्व ग्रामस्थ हनुमान मंदिरात एकत्र आले होते. घडलेल्या घटनाबाबत सदर आरोपीवर कोणतेही कठोर कायदेशीर कारवाई झालेली नाही. जर आरोपीवर कारवाई झाली नाही तर लोकसभा निवडणुकीवर जसे बहिष्कार टाकले तसेच बहिष्कार विधानसभेच्या निवडणूकीवरही घालण्यात येणार आहे.असे मत आगरी कोंढरी पाडा ग्रामस्थ मंडळाचे सचिव कृष्णा पाटील यांनी दिली. तर उपाध्यक्ष धनेश म्हात्रे यांनीही याबाबत आक्रमक भूमिका घेत जोपर्यंत ग्रामस्थांना न्याय मिळत नाही,ग्रामस्थांच्या मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत हा लढा असाच सुरु राहणार असल्याचे सांगितले. उपस्थित महिला ग्रामस्थ पल्लवी ठाकूर यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की आमचे ग्रामस्थांचे १७०० मतदान आहे. आम्हाला न्याय न मिळाल्याने तसेच कोणत्याही राजकीय पक्षाच्या पदाधिका-यांनी लक्ष दिले नसल्याने आम्ही मतदान करणार नाही. हे असेच चालू राहिले तर १७०० मतदार पुढील विधानसभेच्या निवडणूकीत मतदान करणार नाहीत अशी माहिती पल्लवी ठाकूर यांनी दिली. सदर बहिष्कार बाबत गावातील सर्व ग्रामस्थ आगरी कोंढरीपाडा येथील श्री हनुमान मंदिरात एकत्र आले होते. यावेळी सर्वानी एकमुखी निर्णय घेत मतदानावर बहिष्कार घातला आहे.



संपादकीय

## अध्ययन आणि अध्यापन

अध्यापन कौशल्य-ज्ञानाबरोबरच संभाषण कौशल्य, अध्यापन कौशल्य शिक्षकाकडे असणे महत्त्वाचे आहे. पाठ्य विषयाकडे विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून पाहणे: सर्वप्रथम विद्यार्थ्यांची मानसिक, बौद्धिक क्षमता जाणून घेतली पाहिजे. त्यानुसार त्याच्या बौद्धिक, मानसिक पातळीवर उतरून त्याला विद्यार्थ्याला होऊन जाईल अशा भाषेत शिकवले गेले पाहिजे उदाहरणे, दाखले त्याच्या वयाला साजेल तादात्म्य (रिलेट)करेल असे असल्यास त्या संकल्पनेचे आकलन विद्यार्थ्यांना चटकन होते. विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, विचार शक्ती प्रगल्भ टप्प्याटप्प्याने होत असते,त्यामुळे त्यांच्या या कल्पनाशक्तीला विचारशक्तीला चालना देण्याचे कार्य हे शिक्षकाच्या हातात असते. उदाहरणार्थ 'निबंध' या अभ्यास प्रकारात विद्यार्थ्यांना कल्पना विचार करण्यासाठी प्रचंड वाव असतो. यात निबंधाच्या पुस्तकातून निबंध पाठ न करता तुम्ही स्वतः कसे विचार करू शकता हे अध्यापक शिकवू शकतो संकोच, भीती,न्यूनगंड यामुळे काही विद्यार्थी वर्गात शांत असतात परंतु अशा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अध्यापकाने बळकट केला पाहिजे सरते शेवटी सृष्टी आणि सृष्टी पलीकडे बघण्याची दृष्टी देतो तोच असतो शिक्षक.

विचार करण्याची संधी व विचार करायला शिकवणे:- अध्यापकाला त्याच्या विषयाचे सखोल ज्ञान असलेच पाहिजे परंतु विद्यार्थ्याला ते ज्ञान दिल्यावर त्या ज्ञानाच्या पलीकडे त्या ज्ञानातील गहनता समजून घेण्याची वृत्ती अध्यापक विद्यार्थ्यांमध्ये रुजवतो.

अध्यापनाच्या साधनांचा उपयोग:-प्रत्यक्ष चित्रे वस्तू साहित्य प्रयोग रसायने यांच्या आधारे अध्ययन अधिक प्रभावी होऊ शकते. उदाहरणार्थ धान्य विद्यार्थ्यांनी कदाचित पाहिलेली नसतात किंवा नेमक्या धान्याचे नेमके नाव विद्यार्थ्याला ठाऊक नसते तर अध्यापक प्रत्यक्ष धान्य आणून त्यांना स्पर्श करण्यास गंध घेण्यास सांगतील तेव्हा ती वस्तू तिची प्रतिमा विद्यार्थ्यांच्या मनात कायमची रुजण्यास मदत होईल. ऋतू ,ग्रहणे ,कृत्रिम उपग्रह ,पृथ्वीची संरचना हे देखील दृश्यांच्या माध्यमाने ॲनिमेशनच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना दाखवता येतील विविध खेळाच्या सहाय्याने उदाहरणांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी होईल.

संस्कार रुजवणूक आणि जोपासना:- अध्यापन करून केवळ परीक्षार्थी न घडवता ज्ञानार्थी ,सुसंस्कृत माणूस घडविण्याची संधी अध्यापकाकडे असते.अनेक पाठ्यपुस्तकातील धडे असे असतात, ज्यात देशभक्तीची देश प्रेमाची बीजे असतात. धड्यातील कवितेतील आशय विद्यार्थ्याला समजावून सांगतानाच तुम्ही सुद्धा उद्याचे सुजाण भारताचे प्रतिनिधित्व करणार आहात तर हेच देश प्रेम तुमच्यात आहे का? असेल तर कशा पद्धतीने तुम्ही सुजाण नागरिक आहात?

# श्रीशंकर महाराजांची मनोभूमिका!

श्री शंकर महाराज अगदी अलीकडच्या काळात होऊन गेलेले सत्पुरुष आहेत. त्यांची समाधी पुणे येथे सातारा रस्त्यावर धनकवडी भागात आहे. त्यांचा समाधी दिन वैशाख शुद्ध अष्टमी शके १८६९ म्हणजे त्यावेळी दि.२४ एप्रिल १९४७ सोमवार होता आणि आज दि.१५ मे २०२४ आहे. समाधीची अधिकृत नोंद आहे. पण बालपण, माता-पिता, शिक्षण, गुरू, साधना, शिष्य-संप्रदाय इत्यादींचा तपशील हवा तसा मिळत नाही. श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर माहितीपूर्ण लेख... संपादक.

त्यांनीच पुढे एकदा म्हटले होते, "आम्ही कैलासाहून आलो!" नावही शंकर! ते खरोखरच शिवाचे वैराग्य-संपन्न अंशावतार असावेत. नाशिक जिल्ह्यात अंतापूर नावाचे गाव आहे. तिथे कुणी चिमणाजी नावाचे गृहस्थ राहात होते. पोटी मूल-बाळ नव्हते. ते शिवाचे भक्त होते. एकदा त्यांना स्वप्नात दृष्टान्त झाला. "रानात जा. तुला बाळ मिळेल. घेऊन ये." ते त्या दृष्टान्ताप्रमाणे रानात गेले. तिथे त्यांना हा दोन वर्षांचा बाळ मिळाला! शंकराचा प्रसाद म्हणून त्याचे नाव शंकर ठेवले. शंकर या माता-पित्याजवळ काही वर्षे राहिला. नंतर या बाळाने माता-पित्यांनाच आशीर्वाद दिला, "तुम्हाला पुत्रप्राप्ती होईल!" आशीर्वाद देऊन शंकर बाहेर पडला. नाम नाही, रूप नाही, एक स्थान नाही. श्री शंकर महाराजांना नेमके एक नाव नाही. ते अनेक नावांनी वावरत. शंकर या नावाप्रमाणेच सुपड्या, कुंवरस्वामी, गौरीशंकर अशा नावानीही ते ओळखले जात. ही नावे कळली एवढेच! आणखीही काही नावांनी ते वावरत असावेत. नाव जसे एक नाही, तसेच त्यांचे रूपही! काही ठिकाणी त्यांचा उल्लेख अष्टावक्र असाही केलेला आढळतो. डोळे मोठे होते, ते अजानुबाहू होते, त्यांची गुडघे वर करुन बसण्याची पद्धती होती. हे असे रूप! वेगळ्या अर्थाने बहुरूपी! ते कधी एका स्थानीही नसत. त्रिवेणी संगम, सोलापूर, अक्कलकोट, त्र्यंबकेश्र्वर, नाशिक, नगर, पुणे, हैद्राबाद, तुळजापूर, औदुंबर, श्रीशैल- अशा स्थानी त्यांची भटकंती असायची! सांगितली एवढीच स्थाने असतील असेही नाही! म्हणजे शंकर महाराजांचे नाम-रूप-स्थान सांगणे कठीण आहे. कारण खऱ्या अर्थाने ते वैराग्यसंपन्न होते! म्हणूनच शंकर होते!

श्रीशंकर महाराज योगीराज होते, याचा अनेकांनी अनेक प्रकारे प्रत्यय घेतला आहे. ते स्वत: मात्र नेहमी म्हणत, "सिद्धीच्या मागे लागू नका!" पण त्यांनी आपले योगसामर्थ्य कळत-नकळत अनेकांच्या प्रत्ययाला आणून दिले. काहींना सिद्धी हवी असते ती प्रसिद्धीसाठी! त्याने नावलौकिक वाढतो, धन-दौलत मिळते, शिष्य-परिवार वाढतो! म्हणून श्रीशंकर महाराज म्हणत "सिद्धीच्या मागे लागू नये." त्यांना स्वत:ला सिद्धी प्राप्त होत्या पण त्यांनी धन-दौलत, नावलौकिक वा शिष्य-परिवारादि उपाधी मागे लावून घेतल्या नाहीत. ते स्वत: खऱ्या अर्थाने सिद्धींच्या मागे लागले नाहीत. पण शंकर महाराज अलौकिक पुरुष होत, हे चिकित्सक विद्वानांनाही मान्य होते. आचार्य अत्रे, न्यायरत्न विनोद यांच्यासारखे प्रकांड पंडित शंकर महाराजांना मानीत. हे विद्वान त्यांची योग्यता जाणून होते. ते म्हणत, "मला जाती, धर्म काही नाही." ते स्वत: खरोखरीच सर्वांशी समभावाने वागत. त्यामुळे त्यांच्याकडे मुसलमानही येत. एका मुसलमानाने त्यांना आपली काही अडचण सांगितली. शंकर महाराजांनी त्यांना काय सांगावे? "अरे, तू नमाज पढत नाहीस. नमाज पढत जा. तुझी अडचण दूर होईल." ते काय शिकले होते कुणास ठाऊक! पण काही दीड शहाण्या विद्वानांना त्यांनी अस्खलित इंग्रजीतून उत्तरे दिली. त्यांना इंग्रजीचे ज्ञान कसे नि कुठे झाले, कुणास ठाऊक?

श्रीशंकर महाराजांची पारमार्थिक वैराग्य-संपन्न मूर्ती केवढ्या उच्च भूमिकेवर होती, ते त्यांच्या एका सहज उद्गारातून दिसते. ते म्हणाले होते- "मला काही कमी नाही, कारण मला कमावण्यासारखे काही नाही. आणि माझ्याजवळ काही नाही म्हणून मला गमावण्यासारखेही काही नाही." उपदेश- १) सुख-शांती हवी असेल, तर इच्छा, इर्षा, असुया, महत्त्वाकांक्षा, हावरेपणा सोडून दिल्याने अहंकाराने सतत अस्थिर होणारे मन स्थिर होईल. २) सामाजिक-धार्मिक-नैतिक अधिष्ठान गुरुंमुळे प्राप्त होते. पण ते अधिष्ठान विसरून लोक केवळ लौकिक सुखामागे लागल्याने सत्य-नीती हा धर्म होण्याऐवजी पैसा हा धर्म झाला आहे. गुरुस ईश्वर मानून त्यांचे अधिष्ठान जपले पाहिजे. ३) गुरु व देव याविषयी उत्कट प्रेम व दृढ श्रद्धा हवी. ४) जे गुरुला ईश्वर मानून दृढ श्रद्धेने भजतात. त्यांचाच गुरुकृपेने उद्धार होतो. ५) देव सर्वव्यापी आहे असे लोक मानतात. पण जे बोलतात ते आचरणात आणत नाहीत. प्रथम आत्मबोध करावा तरच आत्मसाक्षात्कार घडून येईल. ६) साधनमार्गात अपेक्षा आणि पूर्ती महत्त्वाची असते. पण त्यासाठी विश्वास व श्रद्धा हवी. विद्वत्तेने देवाला जोखू नये. विद्वान मंडळींना शंकाच फार येतात. त्यासाठी त्यांनी आपल्याच अंतरंगात डोकावून पाहावे. त्यायोगे शंका नाहीशा होऊन कार्यप्रवृत्तीची प्रेरणा मिळते. ७) स्वार्थीपणाचा बाजार भरला आहे. त्यातूनच अपेक्षा वाढतात. स्वार्थासाठी मित्राला मदत, कीर्तीसाठी दानधर्म, कौतुकासाठी देणगी मग या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत की, लगेच राग येतो. तोच मुळी आत्मकल्याणाच्या आड येतो. ८) आशा, इच्छा, हव्यास, वित्त यांची हाव कधीच संपत नाही. मग त्यापोटी दु:ख-वेदना होणारच. बोटीतून प्रवास म्हटला की बोट हलणारच. मूल हवे तर प्रसूतीचा त्रास सोसलाच पाहिजे. शरीर म्हटले की व्याधी आलीच. ९) जे आत्मदर्शन प्राप्ती करुन घेतात त्यांना जन्म-मृत्यू नसतो. ते जगद्उद्धारार्थ अवतार म्हणून पुन्हा येतात. १०) सिद्धीपेक्षा भक्ती श्रेष्ठ. ११) सद्गुणांची वाढ झाली तर माणसात देवत्व प्रकट होते. १२) आम्ही कैलास रहिवासी शंकर आहोत. लोकांना देव समजावून सांगण्यासाठी इथे आलो. मनुष्य जन्म असेतोवरच हे समजून घ्या. आत्मकल्याण करुन घ्या. जीवनाचे सार्थक करा. श्रीशंकर महाराज चरित्र हे शब्द आहेत शंकर महाराजांचे. इ.स.१७८५च्या कार्तिक शुद्ध अष्टमीच्या पहाटे सटाणा तालुक्यातील अंतापूर येथे श्री नारायण अंतापूरकर पती-पत्नीस बालक सापडले. श्री.व सौ.नारायण अंतापूरकर यांना संतती नव्हती व ते शिवभक्त असल्याने त्यांनी या बालकाचे नाव शंकर ठेवले. पुढे हेच बालक शंकर हिमालयाकडे निघून गेले. भारत भ्रमणात त्यांनी आपल्या भक्तांसाठी अवतारकार्याचे स्वरूप दर्शवून दिले. सातपुड्याच्या परिसरातील दरोडेखोरांचे जीवन बदलल्यामुळे त्यांना तेथे सुपड्याबाबा म्हणून मानू लागले, तर खान्देशात कुँवरस्वामी, गौरीशंकर, गुजरातमध्ये देवियाबाबा, इस्लाममध्ये रहिमबाबा, आफ्रिकेत टोबो, तर अरबस्थानात नूर महंमदखान, मध्य भारतात लहरीबाबा, दक्षिणेत गुरुदेव अशा अनेक नावांनी भक्त त्यांना मानीत. अक्कलकोट निवासी स्वामी समर्थ यांना शंकर महाराज गुरू मानत. ते भक्तांना स्वामीसेवा जप करावयास लावत. सोलापूर येथील शुभराय मठ, त्र्यंबकेश्वर येथील रामभाऊ ऊर्फ रामचंद्र अकोलकर यांचे घर, अहमदनगर येथील डॉ.धनेश्वर, नारायणराव राजहंस- बालगंधर्व, प्रल्हाद केशव अत्रे, अशा अनेक प्रसिद्ध व्यक्ती महाराजांचे भक्त होऊन गेले.

# मुंबईचा गड राखण्यासाठी महायुतीचा मेगा प्लॅन, पंतप्रधान मोदी उतरणार मैदानात

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून महाराष्ट्रात सभांचा धडाका सुरु आहे. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपला मोर्चा आता मुंबईकडे वळवला आहे. 15 तारखेला महायुतीच्या उमेदवारांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रोड शोचं आयोजन करण्यात आलं आहे. रात्री 8 वाजल्यापासून घाटकोपरच्या LBS मार्गावरील श्रेयस सिनेमा ते गांधी मार्केटपर्यत अडीच किलोमीटरचा रोड-शो होणार आहे. LBS मार्गावरील रोड-शोसाठी वाहतूक पोलिसांकडून निर्बंध जारी करण्यात आले आहेत.

LBS-गांधीनगर जंक्शन- नौपाडा जंक्शन-माहूल घाटकोपर मार्ग दुपारी 2 ते रात्री 10 पर्यंत बंद राहणार आहे. मेघराज जंक्शन- आरबी कदम जंक्शनपर्यंतची वाहतूकही बंद राहणार आहे. अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, घाटकोपर जंक्शन ते साकीनाका जंक्शन हे मार्ग बंद केले जाण्याची शक्यता आहे.हिरानंदानी कॉम्प्लेक्स ते गुलाटी पेट्रोल पंपापर्यंत वाहतूक बंद केली जाऊ शकते. गोळीबार मैदान, घाटकोपर मेट्रो स्टेशन पश्चिमेकडील सर्वेदय जंक्शनपर्यंत वाहतूक बंद राहू शकते.2019 च्या लोकसभेत मुंबईतील सहाही जागांवर महायुतीनं विजय मिळवला होता. दरम्यान मुंबईतील या सहाही जागा राखण्याचं आव्हान पुन्हा महायुतीसमोर असणार आहे. मात्र, राज्यभरात आणि खास करुन मुंबईत उद्धव ठाकरेंप्रती मोठी सहानुभूती निर्माण झालीये. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या रोड शोच्या माध्यमातून मतदारांना आकर्षीत करण्याचा प्रयत्न महायुतीचा असणार आहे.दक्षिण मुंबईतून ठाकरे गटाचे विद्यमान खासदार अरविंद सावंत यांच्या विरोधात शिंदेंच्या शिवसेनेकडून यामिनी जाधव उमेदवार आहेत. मात्र, ठाकरे गटातून शिंदे गटात गेलेले जाधव दाम्पत्यावर जनतेची नाराजी असल्याची चर्चा आहे. त्यामुळे अरविंद सावंतांना ही निवडणूक सोप्पी जाणार असल्याची चर्चा आहे.दक्षिण मध्य मुंबईतून ठाकरे गटाचे अनिल देसाई विरुद्ध शिंदेंच्या शिवसेनेचे विद्यमान खासदार राहुल शेवाळे अशी थेट लढत आहे.



या मतदारसंघात कॉंटे की लढाई होण्याची शक्यता आहे.उत्तर पश्चिम मुंबईतून ठाकरे गटाच्या अमोल कीर्तिकरांची लढत शिंदेंच्या शिवसेनेचे उमेदवार रवींद्र वायकरांशी होईल.. या मतदारसंघात रवींद्र वायकरांविरोधात नाराजी तर ठाकरे गटाप्रती असलेल्या सहानुभूतीचा फायदा आणि मनसेनं वायकरांना केलेला विरोध हा अमोल किर्तीकरांना फायद्याचा ठरु शकतो.

# निवडणुका संपल्या आता मतांच्या गोळाबेरीज चे राजकिय वातावरण

वादळवार्ता/सोयगाव

निवडणूक चे मतदान संपताच मंगळवार पासून राजकीय कार्यकर्ते खेड्यापाड्यात फोन करून बुथची माहिती घेवून मतांची गोळाबेरीज करण्याच्या कामात गुंतलेले असल्याने पुन्हा मतदानानंतर वातावरण तापले आहे सोमवारी झालेल्या मतदानाच्या आकडेवारी वरून मतांची गोळाबेरीज करून आपल्या पक्षाच्या पारड्यात व विरोधकांच्या पारड्यात पडणाऱ्या मतांचे ताळेबंद करून आपलाच विजय कसा होईल असा अंदाज बांधण्याचे काम सोयगाव तालुक्यात राजकिय वर्तुळात सुरू झाले आहे

सोयगाव तालुक्यात ९८ मतदान केंद्रात मतदानाची प्रक्रिया झाली आहे आता निकालाची प्रतीक्षा असताना मात्र राजकिय पक्षांचा कार्यकर्त्यांनी अंदाज बांधण्याचे काम हाती घेतले आहे यामध्ये गावातील स्थानिक राजकारण, जातीय समीकरण,राजकीय पक्षांना प्रभाव आदी बाबींचा विचार करून मतांची आकडेवारी मांडण्यात येत आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यात आता आकडेमोड च्या कामांनी वेग घेतला आहे पक्षांचा कार्यकर्त्यांकडून थेट ग्राउंड लेव्हल वरून माहिती घेण्यात येऊन हा अंदाज बांधण्यात येत आहे यामध्ये बूथ वरील कमी जास्त झालेल्या मतांचीही गोळाबेरीज करण्यात येत आहे...दरम्यान सोयगाव तालुक्यात सर्वच लढती काट्याच्या झालेल्या आहे बनोटी-गोंदेगाव परिसरात तर थेट मतदारांनीच राजकिय पक्षाच्या प्रमुखांना संभ्रमात पाडले आहे बनोटी गोंदेगाव भागात सर्वच उमेदवारांना संमिश्र कौल मतदारांनी दिल्या मुळे या भागातील अंदाज बांधणे कठीण झाले असल्याचे राजकिय वर्तुळात बोलले जात आहे दुसरीकडे सोयगाव-फर्दापुर-सावळदबारा या भागात काट्याच्या लढती झाल्या आहे मतदारांनी या बूथ मध्ये विक्रमी मतदानाची नोंद करून राजकिय पक्षांना बुचकळ्यात टाकून दिले आहे सोयगाव शहरात विक्रमी ६३.८७ टक्के मतदान झाले असून फर्दापुर,सावळदबारा या भागातील मतदान केंद्रावर ही विक्रमी मतदान झाले आहे त्यामुळे मतदारांनी कुणाला कौल दिला व कुणाला नाकारले हे कळणे कठीण झालेले आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यात निकालाचे चित्र अस्पष्ट दिसून आले आहे

## बालाघाट पत्रकार संघ नेकनूर ची नवीन कार्यकारिणी जाहीर अध्यक्षपदी शेख जिया तर उपाध्यक्षपदी गणेश चक्रे यांची निवड

**वादळवार्ता/नेकनुर**

सध्याच्या काळात पत्रकारितेला सकारात्मकतेची किनार असणे अत्यंत आवश्यक झाले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वसामान्यांच्या हितासाठी पत्रकाराने एक नवीन दृष्टी ठेवून काम करणे सध्या गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून बालाघाट पत्रकार संघ ही पत्रकारांची संघटना एक नवा विचार घेऊन पुढे येत आहे ही संघटना येणाऱ्या काळात सर्वसामान्यांचा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा आणि गोरगरीब जनतेचा आवाज बुलंद व्हावा व अन्यायाविरुद्ध काम करण्याची जिद्द घेऊन समोर येत आहे पिढीतांना न्याय देण्याचा या संघटनेचा प्रयत्न राहील. आमची ही संघटना जनतेचा हक्क व्यतिरिक्त पत्रकारान बंधूंसाठी त्यांचे आरोग्य,घर,कुटुंब सुरक्षितता आणि संरक्षण ही पंचसूत्री घेऊन ही संघटना पुढे काम करणार आहे. संघटना पत्रकारांच्या पुढच्या पिढीला दिशा देण्याचे काम करेल नेकनूर येथील स्थानिक पत्रकारांची नुकतीच एक बैठक दि.१४ मे २०२४ रोजी पार पडली बैठकीत पत्रकार संघ अध्यक्षपदी शेख जिया यांची एक मतांनी निवड करण्यात आली सदर बैठकीत कार्यकारिणीची निवड होऊन उपाध्यक्षपदी गणेश चक्रे यांची तर सचिव म्हणून शेख शाकेर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी उपस्थित अभिजीत पवार, सय्यद अर्शद, सय्यद जुल्फेखार, सय्यद तय्यब, शेख तफिल, सय्यद दाऊद, सय्यद राजू आदी सर्वच पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीस विकास शुभेच्छा देण्यात आल्या.

## मुरव्य निरीक्षक अजीमुल हक यांच्या समक्ष झाली स्क्रूटनी

बीड, दि.14: बीड लोकसभा मतदारसंघामध्ये सोमवारी मतदान झाले आहे. मतदानाची टक्केवारी 70.92% इतकी आहे. मतदानाच्या दिवशी विधानसभानिहाय असलेल्या मतदान केंद्रामध्ये झालेल्या मतदानामध्ये 55 %टक्के पेक्षा कमी अथवा 85% टक्के पेक्षा अधिक मतदान झालेल्या केंद्रांनी लिहिलेल्या प्रोसिडिंग नोंदणीची तपासणी मुख्य निरीक्षक अजीमुल हक्क यांनी राजकीय पक्षांच्या समक्ष केली. शासकीय तंत्रनिकेतन येथे आज मतदान यंत्र ठेवण्याची कार्यवाही सुरू असताना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दिपा मुधोळ मुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, यांच्या समक्ष तसेच राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत स्क्रूटनी करण्यात आली.

काही ठिकाणी संशयाच्या आधारावर राजकीय पक्षांनी जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे मतदान नीट न हो असल्याची लेखी तक्रार केली होती. त्याचीही तपासणी आज करण्यात आली.

सहा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्या विधानसभा मतदार संघात ज्या ठिकाणी 55 %टक्के पेक्षा कमी आणि 85% पेक्षा अधिक मतदान झाले अशा मतदान केंद्राचे मतदान केंद्राध्यक्ष त्यांचे सहाय्यक तसेच त्यांनी प्रोसिडिंग केलेल्या नोंदी निवडणूक निरीक्षक श्री हक यांच्यासमोर सादर केले. तसेच राजकीय पक्षांनी केलेल्या संशयात्मक लेखी तक्रारीचेही निरसन यावेळी करण्यात आले. निवडणूक निरीक्षक यांनी त्यांचे सूक्ष्म निरीक्षक यांच्या कडून आलेल्या अहवाला सोबतही उलट तपासणी करून मतदानाच्या वेळी कुठल्याही गैरप्रकार झाला नाही त्याची खातरजमा केली. शहरी भागात काही ठिकाणी 55% पेक्षा कमी मतदान झाले तर ग्रामीण भागात 85 %च्या पुढेही मतदान झाल्याचे प्रोसिडिंग डायरीनुसार लक्षात आले. यासह मतदान ओळखपत्राच्या व्यतिरिक्त इतर ओळखपत्राच्या माध्यमातून झालेल्या मतदानाबद्दलही विचारना करण्यात आली. यामध्ये मतदान ओळखपत्राच्यानंतर सर्वाधिक मतदान हे आधार ओळखपत्राद्वारे करण्यात आल्याचे प्रोसेसिंग डायरीवरून लक्षात आले. हा सर्व अहवाल भारत निवडणूक आयोग त्यांच्याकडे पाठवण्यात येणार असल्याचे निवडणूक निरीक्षक श्री हक यांनी यावेळी सांगितले.असा शब्द दिल्यामुळे लिंबागणेश सर्कल मधील बहुतांश मराठा समाजाने बजरंग बप्पा यांच्या पाठीशी उभा राहील्याचे दिसुन येत आहे.

## इयत्ता दहाविच्या सीबीएसई परिक्षेत ८४% गुण घेवून जास्मीन मुलानी चे यश

**वादळवार्ता/तुळजापूर**

तुळजापूर येथील जास्मीन मुलानी या विर्धीनीने १० वी च्या सीबीएसई पर्टन च्या परिक्षेत ८४% गुण घेवून यश संपादन केले आहे व या मुलीने यशाचे श्रेय त्याचा आई रेश्मा मुलानी यांना दिले आहे माझ्या आई ने मला वेगवेगळ्या प्रकारचे ट्युशन व घरी सुद्धा प्रॅक्टिस घेऊन मला नेहमीच शिक्षणाबाबत मार्गदर्शन दिले त्यामुळेच मी हे यश संपादन केले आहे जस्मिन ची आई तुळजापूर येथील टाटा इन्स्टिट्यूट येथे लिपीक या पदावर कार्यरत आहेत जास्मीन मुलानी यांच्या यशा बद्दल लोकशाही पत्रकार संघाचे कार्यअधक्ष व शासकीय गुत्तेदार अय्युब खान पठाण यांनी अभिनंदन केले आहे.



## लोकशाहीचा उत्सव साजरा होत असतानाच पिंपरनई गावावर शोककळा; विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने विवाहितेचा मृत्यू:- डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश:- बीड तालुक्यातील** -- पिंपरनई येथे काल दि.१३ सोमवार रोजी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर मतदान सुरू असतानाच दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास यमुना अनिल आमटे वय ३३ वर्षे या विवाहितेचा घरात विद्युत प्रवाह उतरल्याने विजेच्या धक्क्याने जागीच मृत्यू झाला आहे. एकीकडे गावात लोकशाहीचा उत्सव साजरा करत असतानाच घडलेल्या दुर्दैवी घटनेने गावावर शोककळा पसरली असुन घटनेनंतर मतदान केंद्रावर शुकशुकाट होता.गरीब ऊसतोड मजुरांच्या कुटुंबातील व्यक्तींचा मृत्यू झाल्याने परीसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. यमुना आमटे यांना पृथ्वीराज व प्राची नावाची १२ वर्षे वयाची जुळी मुले आहेत.आनिल ऊसतोडणीसाठी बाहेर गावी गेल्यानंतर ही घटना घडली. यमुनाबाई यांच्या आई शकुंतला लक्ष्मण वायभट या शेतातुन दुपारी घरी आल्यानंतर त्यांना यमुनाबाई बेशुद्ध पडलेल्या दिसल्या. हात लाऊन उठवण्याचा प्रयत्न केला असता त्यांना करंट बसल्यानंतर त्यांनी आरडाओरड केल्यानंतर शेजारी जमा झाले.वायर तोंडुन त्यांना बीड येथील रूग्णालयात नेण्यात आले परंतु त्यापुर्वीच डॉक्टरांनी मृत घोषित केले.

दुर्दैवी घटनेनंतर मतदान केंद्रावर शुकशुकाट:- सरपंच बाळासाहेब वायभट पिंपरनई गावात एकुण ९३७ मतदान असुन काल दुपारी ३ वाजेपर्यंत ७१३ मतदान केल्याची नोंद होती.दुपारी ३ वाजता एकच आरडाओरडा झाल्याने यमुना आमटे यांना घेऊन बीड येथील रूग्णालयात नेण्यात आले परंतु तोपर्यंत मृत्यू झाला होता. दुर्दैवी घटनेनंतर मतदान केंद्राकडे कोणीही फिरकले नाही.

सर्वोतोपरी मदत महावितरण कडुन केली जाईल:- हुलकुडे उपअभियंता महावितरण लिंबा गणेश घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असु आज तालुकास्तरीय अधिकारी पिंपरनई येथे घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करणार आहेत व महावितरण कडुन सर्वोतोपरी मदत करण्यात येईल.असे आश्वासन लिंबागणेश येथील महावितरणचे उपअभियंता हुलकुडे यांनी दिले आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतुन मदत करा:- डॉ.गणेश ढवळे यमुना आमटे या ऊसतोड मजुर असुन त्यांच्या नावावर २ एकर कोरडवाहू शेती असुन गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतुन शेतकऱ्यांच्या अपघाती मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांस २ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य दिलं जाते त्या योजनेअंतर्गत यमुनाबाई यांच्या लहान जुळ्या मुलांच्या भवितव्यासाठी आर्थिक सहाय्य करण्यात यावे.अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी तहसीलदार,मंडळ अधिकारी, तलाठी केली आहे.

## छ. संभाजी महाराज यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमाने साजरी...

**नायगाव/हानुमंत चंदनकर**

स्वराज्यासाठी आपले बलिदान देणारे महान शुरविर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त नायगाव शहरातील श्रद्धा एम्पोरियम समोर प्रतिमेचे पूजन करून विकास पुरुष कार्यसम्राट लोकप्रिय आमदार राजेश पवार यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने व खिचडी मठा अन्नदान वाटप करून साजरा करण्यात आला.

या वाढदिवस कार्यक्रमास भाजपा महिला शहराध्यक्ष सौ. पल्लवी बळीराम वडजे, भा ज पा तालुका अध्यक्षा सौ जयश्री बालाजी नरवाडे बाबासाहेब हंबर्डे, देविदास बोमनाळे ,श्रीहरी देशमुख नरंगलकर, डॉ.शिवाजी कागडे, गंगाधर कल्याण, शहराध्यक्ष माधव पा.कल्याण, प्राचार्य मनोहर पवार, बालाजी मदेवाड, तालुकाध्यक्ष दत्ता पाटील ढगे, युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष राहुल पाटील शिंदे, राजू बेळगे, प्रकाश हेंडगे यासह अनेकांची प्रामुख्याने उपस्थिती होती .

छत्रपती संभाजी महाराज यांचा स्वराज्यासाठी जाज्वल्य इतिहास साक्षी ठेवून उपस्थित मान्यवरांनी व कार्यकर्त्यांनी शहरातील बॉम्नाळे आईल मिल येथील आ.पवार यांच्या संपर्क कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.हेडगेवार चौकात फटाके वाजून जल्लोष साजरा केल्यानंतर शासकीय रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप केले तर श्रद्धा लेडीज एम्पोरियम समोर अभिवादन करून श्रीहरी देशमुख नरंगलकर सौ पल्लवी बळीराम वडजे, डॉ .शिवाजी कागडे यांनी आपले विचार मांडले.

आजच्या दिनाचे औचित्य साधून आमदार राजेश पवार व भाजयुमो अध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांचाही वाढदिवस असल्याने आमदार राजेश पवार हे विदेशात असल्याने त्यांना ऑनलाईन शुभेछा दिल्या तर राहुल शिंदे यांना प्रत्यक्ष शुभेछा देण्यात आल्या .वाढदिवस व जयंती कार्यक्रम साजरा केल्यानंतर सर्वांसाठी खिचडी व मठा वाटप करण्यात आला.

यावेळी राहुल पाटील नकाते,सर्जेराव देशमुख, धनंजय जाधव, देवानंद शिंदे, रामदास शिंदे, दत्ता शिंदे, रमेश कदम, अरविंद शिंदे, भगवान डांगे, मारोती सावरखेडकर, गंगाधर स्वामी महाराज, राजीव आलुवडगावकर, धोंडू पाटील




बेंद्रीकर, माधव कोलगाने, प्रवीण वटबे, सुदर्शन देशमुख,राजु सोनकांबळे ,जुनैद पठाण, डोंगरावकर ,जुने पाटील यासह अनेकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# ४१ उमेदवारांचे भवितव्य ४ जूनपर्यंत झाले मतयंत्रात बंद

• लोकसभा निवडणुकीत बीडमध्ये 70.92 %टक्के मतदान
• मतदान यंत्र त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था ; 24 तास सीसी टीव्ही कॅमेरतून निगराणी
• मतदार, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, प्रतिनिधींचे जिल्हाधिकाऱ्यांनी मानले आभार

बीड दि. 14 :लोकसभा निवडणुकीसाठी काल सोमवारी 13 मे रोजी मतदान झाल्यानंतर आज सकाळपर्यंत 39 बीड लोकसभा मतदारसंघातील सहा ही विधानसभा क्षेत्रातील मतयंत्र बीड येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात स्ट्राँगरूममध्ये पोहचले आहेत. निवडणूक निरीक्षक, जिल्हाधिकारी, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्राँग रूम सिलबंद करण्यात आले. लोकसभा निवडणूक यशस्वी.पार पाडण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी समस्त मतदार, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, प्रतिनिधींचे आभार मानले आहेत. बीड लोकसभा मतदारसंघासह राज्यातील 11 मतदार संघात काल मतदान पार पडले. बीडमध्ये 41 उमेदवार रिंगणात आहेत. निवडणूक आयोगाकडून आलेल्या आकडेवारीनुसार बीडमध्ये 70.92 %टक्के मतदान झाले आहे. सर्वाधिक मतदान आष्टी विधानसभा क्षेत्रात झाले आहे. 4 जून रोजी बीडच्या खासदाराची निवड होणार असून शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयामध्ये ही मतमोजणी होणार आहे.

स्ट्राँग रूमला कडक सुरक्षा शासकीय तंत्रनिकेतन मध्ये ज्या ठिकाणी मतयंत्र ठेवलेली आहेत. त्या ठिकाणी कडेकोट बंदोबस्त करण्यात आला आहे. या ठिकाणी कोणालाही प्रवेश नाही. त्रीस्तरीय सुरक्षा व्यवस्था या ठिकाणी कार्यरत आहे. यामध्ये बाहेरील सुरक्षा व्यवस्था, स्थानिक पोलीस बघतात. मधल्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये राज्य राखीव पोलीस दलाचे कर्मचारी आहेत. तर ज्या ठिकाणी मतपेट्या सीलबंद केल्या आहेत. त्या ठिकाणी केंद्रीय राखीव दलाचे सशस्त्र जवान 24 तास कडा पहारा ठेवून आहेत. ही सुरक्षा व्यवस्था 4 जून पर्यंत राहणार आहे. 3 जूनला मतमोजणीचे "मॉक ड्रील" होईल.

आज निवडणूक निरीक्षक अजीमुल यांच्या मुख्य उपस्थितीत स्ट्राँग रूम सील करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यासाठी शासकीय तंत्रनिकेतन परिसरात जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे , अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी शिव कुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, सहा विधानसभाक्षेत्राचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीतील मतदान काल झालेल्या 39 बीड लोकसभा मतदारसंघात मतदानानंतर मतदानाची नेमकी टक्केवारी 70.92% इतकी आहे.

बीड लोकसभा मतदार संघात 11लाख 34 हजार 284 पुरुष मतदार होते. तर 10 लाख 08हजार 234 महिला मतदार आणि 29 इतर मतदार होते असे एकूण 21लाख 42 हजार 547 मतदार होते. यापैकी 8 लाख 31 हजार 245 पुरुष मतदारांनी मतदान केले. यांची 73.29% इतकी टक्केवारी आहे. तर 6 लाख 88 हजार 270 महिलांनी बजावला मतदानाचा हक्क. यांची 68.27% इतकी टक्केवारी आहे. इतरांमध्ये येणाऱ्या 29 पैकी 8 मतदारांनी मतदान केले. यांची 35.51% इतकी टक्केवारी आहे.

## श्री सुभाष उमरकर यांना राज्यस्तरीय जिवन गौरव पुरस्कार

जळगाव वृत्तसेवा साहित्य क्षेत्रातले हरहुन्नरी, ग्रामिण कलाव्यासंगी कवी अलककार दादासो. श्री सुभाष उमरकर नाशिक यांना नुकताच वसुनंदिनी फाऊंडेशन संचलित एम के व्हेंचर्स जळगाव सन्मानित राज्यस्तरीय जिवन गौरव पुरस्कार २०२४ जाहिर झाला असुन संस्थेचे अधिकृत निवडपत्र विद्याधर सोनवणे संस्थापक अध्यक्ष , संस्थापक सचिव माधूरी कुळकर्णी वसुनंदिनी फाऊंडेशन यांच्या स्वाक्षरीचे प्राप्त झाले असुन, भव्यदिव्य नेत्रदिपक सोहळ्यात दिग्गज साहित्यिकांच्या उपस्थितित जळगाव येथे लवकरच पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याने सामाजिक साहित्यिक क्षेत्रात सर्वत्र समाधान व्यक्त होत असून श्री सुभाष उमरकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ह्या आधी त्यांना अनेक मान सन्मान पुरस्कार मिळाले असुन वयाच्या अर्धचंद्रापुढे जिवन गौरव पुरस्कार मिळाल्याने खऱ्या अर्थाने उत्तर महाराष्ट्रातून विशेष म्हणंजे ग्रामिण भागातील गावकुसाचा एक व्रतस्थ निस्वार्थ भावनेने साहित्याची अविरत सेवा करताहेत ! वसुनंदिनी फाऊंडेशन जळगाव हि संस्था गोरक्षणा बरोबरच कँन्सरग्रस्त रुग्णांना मदत करते, दरवर्षी महाराष्ट्रातील अनेक कवी लेखक वकील डॉक्टर इंजिनियर शिक्षक प्राध्यपक निसर्गप्रेमी अनेकांना त्यांनी सन्मानित केले असुन ह्या वर्षी अनेक प्रस्तावातून नाशिकमधून साहेबरावतात्या नंदन व श्री सुभाष उमरकर यांची जिवन गौरव पुरस्कारा साठीची निवड म्हणंजे आयुष्याच्या नाटकातला संध्याकाळच्या अंकातला शेवटच्या प्रवेशपर्वात मिळालेला आनंदोत्सवी लाईफ बोनसच म्हणावा लागेल

## धारुर शहरात छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**किल्ले धारुर**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी धारुर शहरात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली

शहरातील तांदळवाडी रोड येथे संभाजी महाराज चौकात संभाजी महाराज यांच्या प्रतिमे पुजन करुन छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराज चौक किल्ले धारुर येथे १४ मे रोजी संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करुन मोठ्या उत्साहा साजरी करण्यात आली.



यावेळी माजी नगराध्यक्ष स्वरुपसिंह हजारी नगरसेवक संजित कोमटवार,कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनिल शिनगारे, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष सिध्देश्वर रंदवे,राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष नितिन शिनगारे,सुरेश गवळी,विनायक शिनगारे,डॉ.भागवत शिनगारे,संचालक संदिप शिनगारे, शिवभक्त प्रतिष्ठाचे अध्यक्ष विश्वास शिनगारे,ॲड.परमेश्वर शिनगारे,नितिन भाई शिनगारे,नागेश शिनगारे,मनसे तालुकाध्यक्ष प्रशांत शिनगारे,सुदर्शन शिनगारे,विजय शिनगारे, पत्रकार अतुल शिनगारे,सचिन थोरात,इश्वर खामकर,ज्ञानेश्वर शिंदे,सोनु फुके,बापु खामकर,शिवराज शिनगारे,सनी शिनगारे,अविनाश ठोंबरे, कृष्णा उकंडे,युवा मोर्चा ॲड. मोहन भोसले,अजित शिनगारे,धनंजय शिनगारे,निलेश शिनगारे, इंजि. जनक फुन्रे,अंकुश कदम,अशोक कुरवडे,भैय्यासाहेब साखरे,संकेत शिनगारे,सागर इखे,निलेश शिनगारे,शुभम निकते,प्रसाद शिनगारे,अमित शिनगारे,बालाजी शिनगारे,राहुल शिनगारे,गणेश साखरे,शाम फावडे,सह आदी नागरिक उपस्थित होते.

## छत्रपती संभाजी महाराजांनी स्वाभिमानाने जीवन जगायला शिकवला - प्रा.पंजाब येडे.

**(बीड प्रतिनिधी)**

बीड 14 (प्रतिनिधी) छत्रपती शिवरायांनी अठरापगड जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन स्वराज्य निर्माण केले. तेच स्वराज्य पुढे चालवत असताना छत्रपती संभाजी महाराजांना अनेक संकटाचा सामना करावा लागला. परंतु कठीन परिस्थितीमध्ये देखील न डगमगता आपल्या स्वाभिमानी मावळ्यांना सोबत घेऊन असंख्य लढाया त्यांनी जिंकल्या. प्रसंगी आपले बलिदान स्वराज्यासाठी अर्पण केले. परंतु शेवट पर्यंत आपला स्वाभिमान कायम ठेवला. स्वाभिमानाने कसे जगावे हे छत्रपती संभाजी महाराजांनी आम्हाला शिकवला आहे.असे प्रतिपादन प्रा. पंजाब येडे यांनी केले आहे. येथील संभाजी राजे लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स महाविद्यालय बीड या महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला डोंगरे सर, संस्था सचिव प्रा.गणेश पोकळे, प्राचार्य बप्पासाहेब हावळे,राहुल वायकर, अशोक सुखवसे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा.येडे म्हणाले की, जगाच्या पाठीवर एकही लढाई न हरणारा एकमेव राजा छत्रपती संभाजी महाराज होते. असंख्य आघाड्यावर संकटे झलक त्यांनी आपले कार्य केले. असंख्य संकटे आली तरी संकटाला न डगमगता सामोरे कसे जायचे आणि यशस्वी कसे व्हायचे ही शिकवण आम्हाला छत्रपती संभाजी महाराजांनी दिली आहे. त्यांचे विचार आम्हाला सदैव प्रेरणा देतात असेही प्रा. पंजाब येडे म्हणाले. यावेळी डोंगरे सरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. सुहास गाढवे यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. राजश्री महाजन, प्रा.भूषण मठपती, प्रा. ओंकार देशमुख, प्रा. शेख, महेश निवडे,दीपक जाधव, सचिन चौरे, सौ. खोसे कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.



पाटोदा येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करताना संभाजी ब्रिगेड जिल्हा अध्यक्ष महेंद्र मोरेतालुका अध्यक्ष गणेश केवडे, जनार्धन जाधव, रवी जावळे, संदिप नेमाने, अप्पा सातपुते, प्रदुम सवासे व अनेक जण उपस्थित होते

# दोन उमेदवारांना निवडणूक खर्चातील तफावतीबाबत नोटीस

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

बीड, दि.14: निवडणूक खर्चात झालेल्या तफावतीबाबत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार पंकजा मुंडे आणि नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना नोटीस बजावण्यात आलेली आहे. निवडणुकीच्या काळात निवडणूक खर्चाची तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास यांच्या उपस्थितीत तिनदा करण्यात आली. दि. 4, 8 मे आणि 12 मे रोजी निवडणूक खर्च तपासणी करण्यात आलेली आहे. या तपासणीमध्ये तफावत आलेल्या उमेदवारांना नोटीस जारी करण्यात आलेले आहे. तिसरी तपासणी 12 मे रोजी पार पडली असून यामध्ये झालेल्या खर्चांमध्ये तफावत आलेल्या दोन उमेदवारांना नोटीस जारी झाले आहे. पंकजा मुंडे या उमेदवाराने 24 एप्रिल ते 2 मे या कालावधीतील खर्च तफावती बाबत नोटीस देऊन खुलासा सादर करण्यास कळविले होते त्याप्रमाणे तफावत मान्य केली असून 5 लाख 95 हजार 63 एवढा खर्च निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करण्यात आलेला होता. दिनांक 24 एप्रिल ते 10 मे पर्यंत खर्च 20 लाख 22 हजार 801 रुपये सादर केलेला आहे. निवडणूक निरीक्षक यांच्या कक्षाकडून कार्यालयाच्या छायांकित निरीक्षण नोंदवहीनुसार नोंदविण्यात आलेल्या याच कालावधीमध्ये 41 लाख 16 हजार 841 रक्कम दिसून आली आहे. 3 ते 10 मे या कालावधीतील छायांकित नोंदवहीनुसार झालेल्या खर्चाचा विचार करता उमेदवाराकडून 20 लाख 94 हजार 40 रुपये कमी दर्शविण्यात आलेले आहेत. बजरंग सोनवणे या उमेदवाराच्या खात्यात दिनांक 22 एप्रिल ते 2 मे या कालावधीत आलेल्या तफावतीबाबत नोटीस जारी करण्यात आले होते. उमेदवारांनी तफावत मान्य केली असून तफावतीची रक्कम 5 लाख 31 हजार 294 इतकी होती मात्र, ही रक्कम अद्याप खर्च नोंदवही मध्ये समाविष्ट करून घेतल्याचे दिसून आढळले नाही. तसेच 3 मे ते 6 मे 2024 या कालावधीतील झालेल्या खर्चातही तफावत होती. त्यासाठी, देखील नोटीस जारी करण्यात आलेले होते ही रक्कम 4 लाख 27 हजार 937 एवढी निवडणूक खर्चात समाविष्ट करणे अपेक्षित होते परंतु ती पण रक्कम दर्शविण्यात आलेली नाही. तिसऱ्या खर्च तपासणीमध्ये 7 ते 10 मे पर्यंत चा खर्च सादर केलेला होता. या खर्चाची तपासणी केली असता पहिल्या व दुसऱ्या खर्चातील तफावती दिसून आढळल्या नाहीत. अशा प्रकारे 22 एप्रिल ते 10 मे या कालावधीमध्ये छायांकित निरीक्षक नोंदवहीशी तुलना करता 9 लाख 59 हजार 231 एवढी तफावत दिसून आली आहे. हा खर्च सदर उमेदवाराने मान्य केलेला आहे. मात्र निवडणूक खर्च नोंदवही मध्ये तशी नोंद घेतलेली नाही.

खर्च नोंदवही मधील भाग क दैनंदिन खर्च नोंदवही, भाग ख रोकड नोंदवही, व भाग ग बँक नोंदवही याप्रमाणे सर्व नोंदवह्या दैनंदिन पणे अद्यावत करण्यात याव्यात.

खर्च निरीक्षक श्री बिस्वास यांनी दिलेल्या समक्ष सुचनानुसार खर्चाची उपक्रमाणके, प्रमाणाचे सादर करणे दैनंदिन खर्चानुसार सदरील प्रमाणकांवर अनुक्रमांक दर्शविणे, खर्चाचे प्रदान हे धनादेशाद्वारेच करून त्यानुसार बँक खाते स्टेटमेंट सादर करणे. आदींचे काटपोरपणे पालन करण्याचे निर्देश त्यांनी खर्च तपासणी करताना दिले. तसेच यापुढे खर्च सादर करताना कसल्याही प्रकारची तफावत व उणीव राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशाही सूचना केल्या होत्या.

उमेदवारांच्या खाते तपासणी अंती सोमवार दिनांक 13 मे रोजी नोटीस जारी करण्यात आले असून 48 तासाच्या आत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे अन्यथा भारतीय दंड संहितेच्या कलम 171 झ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी कळविले आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )